**नि.फौ.ख.क्रं. १७८/२०२०** **निशाणी क्र. ०६**
**शासन .वि. संजय बावणे**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०२ ची शपथेवर जबानी**

.......

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | – | अमोल सुरज देशमुख |
| **वय** | – | ३६ वर्षे, धंदा – शेती, |
| **राहणार** | – | साकुर्ली, तालुका समुद्रपूर व जि. वर्धा. |

.......

**सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत**

**१.** दि.०९/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी कुठेही बोलविले नव्हते. माझ्या समक्ष पंचनामा करण्यात आलेला नाही. माझी एका कागदावर सही घेण्यात आली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहित नाही. सहीला **निशाणी क्र.०७** देण्यात येते. दि.३१/०८/२०२० रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केलेले नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहित नाही. सहीला **निशाणी क्र.०८** देण्यात येते.

**सरतपास संपला**

**साक्षीदार हा अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्यामुळे सदर साक्षीदारास अभियोगपक्षाने उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला आरोपीच्या घरासमोर पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने पोलीसांना माझ्या समक्ष घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला व त्यावर मी वाचुन व समजुन सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना आरोपीने माझ्या समक्ष एका वेळवाची काठी दिली होती. हे

म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे विधीज्ञ आर.व्ही.मुन यांनी उलटतपास नाकारला.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.10.28 17:47:26 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**<u>दिनांक</u>** : २८/१०/२०२५